दै. पुण्यनगरी दि. 28/02/25

# फरार आरोपीचा पोलिसांवरच गोळीबार

## पोलिसांच्या प्रत्युत्तरात आरोपी जखमी

**नांदेड / प्रतिनिधी**

शहरातील सिडको परिसरात एकावर तलवारीने हल्ला करून जखमी करून फरार झालेल्या आरोपीला अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर आरोपीने हल्ला केला. त्याने त्याच्या जवळील गावठी पिस्टलने फायर केले. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या हल्लात त्याच्या पायावर गोळी झाडण्यात आली. त्यात तो जखमी झाल्यावर त्याला अटक करून विष्णुपुरीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सदरील घटना गुरूवारी (दि. २७) घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फरार आरोपी अविनाश मिरासे (वय ३०) हा ग्रामिण पोलिस ठाण्याच्या हद्दीत दारू पित बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर त्यास अटक करण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर आरोपीने स्वतः जवळील देशी कट्ट्यातून फायरिंग केली. यानंतर पोलिसांनीही त्याला प्रत्युत्तर देत फायरिंग केली. यात आरोपी मिरासेच्या पायावर गोळी झाडण्यात आली. त्यामध्ये आरोपी अविनाश मिरासे जखमी झाला असून त्याला शासकीय रुग्णालयात उपचाराकरता दाखल केले आहे. सदरील आरोपी हा अनेक गुन्ह्यात सध्या फरारी असून त्याचा शोध पोलीस पथक व स्थानिक गुन्हे शाखा घेत होती.